# सांस्कृतिक विभाग - २०१८-२०१९

एन.बी.नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग,सोलापूर येथे दि.२० आक्टोंबर ते २३ आक्टोंबर,२०१८ रोजी संपन्न झालेल्या सोलापूर विद्यापीठ १५ व्या युवा महोत्सवात महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला. संघाने वक्तृत्व, समुहगीत, सुगमगायन, शास्त्रीय गायन, रांगोळी, निर्मितीचित्र, स्थळचित्रण, प्रश्नमंजुषा, लघुनाटिका, मुकनाटय, वादविवाद, पथनाटय आदि स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी उत्तम सादरीकरण केले. एकांकिका स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांकाचे पारिपोषिक जिंकले.

एकांकिका स्पर्धेत अबोली गरड-बी.ए.२, गौरी सरोदे-बी.ए.२, शेख शाहीन-बी.ए.१, रोंगे एकनाथ-बी.ए.१ व वाघमारे तेजस-बी.ए.३ यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले त्यामध्ये सरोदे गौरी-बी.ए.२ हिला उत्कृष्ट दिग्दर्शन तर गरड अबोली-बी.ए.२ हिला उत्कृष्ट स्त्री अभिनयाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धेत शेख शमिना-बी.ए.२ या विद्यार्थीनीने तृतीय क्रमांक मिळविला.

सांस्कृतिक विभागाच्यावतीने महाविद्यालयात जयंती, पुण्यतिथींचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच दहशतवाद विरोधी दिन, संविधान दिन आदि कार्यक्रम घेण्यात आले. स्नेहसंमेलनानिमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या त्याबरोबरच रोज डे, परफ्युम डे, साडी डे, ट्रॅडिशनल डे इत्यादीच्या माध्यमातून महाविद्यालयाचे वातावरण उत्साहवर्धक आणि चैतन्यमय बनविण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला.